कामधेनू सेवाभावी संस्थेचे,

# वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर

## (कला, वाणिज्य व विज्ञान)

ता. अंबाजोगाई, जि. बीड - ४३१५१९

नॅक मूल्यांकन 'बी' दर्जा प्राप्त

# माहिती पुस्तिका
## २०१९-२०

**Ph. Office** : 02446-242186 / 242011

**Fax** : 02446-242186 **Whatsapp** : 7507271006

**E-mail** : principalvcg@rediffmail.com, vasundharacollege2000@gmail.com

**Website** : www.vasundharacollege.org.in

**Facebook** : www.facebook.com/vasundharacollege2000@gmail.com

राष्ट्रीय मूल्यांकन एवं प्रत्यायन परिषद

विश्वविद्यालय अनुदान आयोग का स्वायत्त संस्थान

**NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL**

An Autonomous Institution of the University Grants Commission

# Certificate of Accreditation

The Executive Committee of the
National Assessment and Accreditation Council
on the recommendation of the duly appointed
Peer Team is pleased to declare the

**Vasundhara College**

Ghatnandur, Tal. Ambajogai, Dist. Beed,
affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Maharashtra as

**Accredited**

with CGPA of 2.47 on seven point scale
at B grade
valid up to February 21, 2022

Date : February 22, 2017

Director

EC(SC)/22/A&A/76.1

## आमचे मार्गदर्शक



**मा.श्री. बालासाहेब देशमुख**

अध्यक्ष, कामधेनू सेवाभावी संस्था, घाटनांदूर

## शुभेच्छा संदेश !



कामधेनू सेवाभावी संस्थेच्या घाटनांदूर सारख्या ग्रामीण भागातील वसुंधरा महाविद्यालयामध्ये प्रवेशीत व प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक स्वागत!

इ.स. २००० साली घाटनांदूर व परिसरातील गरिब, होतकरु मुला-मुलींना उच्च शिक्षण स्थानिक स्तरावर उपलब्ध व्हावे, म्हणून कामधेनू सेवाभावी संस्थेचे सचिव मा.गोविंदराव देशमुख व सर्व पदाधिकारी यांच्या पुढाकाराने वसुंधरा महाविद्यालय सुरु करण्यात आले. या महाविद्यालयाचे नावलौकिक करणारा प्रत्येक विद्यार्थी सामाजिक बांधिलकी जोपासणारा, संविधानातील नैतिक मूल्यांचा आदर करणारा, वडिलधाऱ्यांची अवितरपणे सेवा करणारा, जिव्हाळा, सद्भावना व सद्गुण यांचा सुरेख संगम साधाणारा घडला पाहिजे, हे संस्थेचे उद्दिष्ट संचालक मंडळाच्या सहकार्यातून साकारत आहे.

'स्वप्नांना सत्याचा स्पर्श झाला पाहिजे' या उक्तीप्रमाणे कृती महाविद्यालयातील विद्यार्थी ज्ञानग्रहण क्षमता वाढविणाऱ्या विविध उपक्रमातून होताना दिसून येते. उच्च शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या स्वावलंबनाचे स्वप्न साकार व्हावे, म्हणून संस्थेच्या माध्यमातून समृद्ध ग्रंथालय, भव्य क्रीडांगण, अद्यावत स्वरुपाची संगणक, विज्ञान प्रयोग शाळा व इतर अनेकविध विद्यार्थी हितोपयोगी उपक्रम अशा सोयी, सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य करणारा व योग्य शैक्षणिक पात्रताधारक प्राध्यापक वर्ग कार्यरत आहे. त्यांच्यात अंगभूत असणाऱ्या अध्यापन कौशल्यातून सर्व अभ्यासक्रमाची दिशा विद्यार्थ्यांनी वेळीच समजून घेतली पाहिजे. त्यातून जीवनाची दिशा स्पष्ट होईल.

महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या दिशादर्शक सुविधांचा उपयोग करुन घेऊन, मनन आणि चिंतनाने स्वत:चे, आई-वडिलांचे, संस्थेचे व महाविद्यालयाचे नाव उज्वल करण्यासाठी आपणास यशाचा मार्ग नक्कीच सापडेल, अशी आशा बाळगतो व सर्वांना सकारात्मक प्रगतीच्या शैक्षणिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देतो!

श्री. गोविंद देशमुख
सचिव, कामधेनू सेवाभावी संस्था, घाटनांदूर

वसुंधरा कला महाविद्यालय घाटनांदुर ता. अंबाजोगाई जि. बीड

कामधेनू सेवाभावी संस्थेचे,

# वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर

(कला, वाणिज्य व विज्ञान)

ता. अंबाजोगाई, जि.बीड – ४३१५१९

नॅक मूल्यांकन 'बी' दर्जा प्राप्त

* प्रकाशक *

## प्राचार्य डॉ. अरुण दळवे

* कार्यकारी संपादक *

प्रा.डॉ. संजय खाडप

प्रा.मकरंद जोगदंड

* कार्यालयाची वेळ *
सोमवार ते शनिवार सकाळी ९.०० ते ५.००
रविवार व इतर सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी
कार्यालय बंद राहील.

वसुंधरा कला महाविद्यालय, घाटनांदुर ता. अंबाजोगाई, जि. बीड

# कामधेनू सेवाभावी संस्था, घाटनांदूर

## कार्यकारिणी

| | | |
|---|---|---|
| १) | मा.श्री. बालासाहेब यशवंतराव देशमुख | अध्यक्ष |
| २) | मा.श्री.डॉ. अब्दुल समद अब्दुल अज़िज़ | उपाध्यक्ष |
| ३) | मा.श्री. गोविंद बालासाहेब देशमुख | सचिव |
| ४) | मा.श्री. दिग्विजय रमेशराव घुटेपाटील | सहसचिव |
| ५) | मा.श्री. बाबासाहेब व्यंकटराव देशमुख | कोषाध्यक्ष |
| ६) | मा.श्री. राजेसाहेब भगवानराव औताडे | सदस्य |
| ७) | मा.श्री. प्रशांत बालासाहेब देशमुख | सदस्य |

## महाविद्यालय विकास समिती (C.D.C.)

| | | |
|---|---|---|
| १) | मा.श्री. बालासाहेब यशवंतराव देशमुख | अध्यक्ष |
| २) | श्री. गोविंद बालासाहेब देशमुख | सचिव |
| ३) | डॉ. मोरे अर्जुन मोहनराव | विभाग प्रमुख |
| ४) | डॉ. संजय बाबुराव खाडप | विभाग प्रमुख |
| ५) | प्रा. मकरंद बळीराम जोगदंड | विभाग प्रमुख |
| ६) | डॉ.बायजा महादेव कोटुळे | महिला विभाग प्रमुख |
| ७) | श्री. उमेश रामराव सरनाईक | शिक्षकेत्तर कर्मचारी |
| ८) | श्री.नितेश काशीरामसिंग कोकणे | शिक्षण |
| ९) | श्री. नृसिंह प्रल्हादराव सुर्यवंशी | उद्योग |
| १०) | प्राचार्य राजाभाऊ तुकाराम बेद्रे | संशोधन |
| ११) | श्री.दत्ता गंगाराम वालेकर | समाजसेवा |
| १२) | डॉ.जगन्नाथ विठ्ठलराव तुडमे | नॅक समन्वयक |
| १३) | कु.पूनम नानासाहेब मिसाळ | विद्यार्थी सचिव |
| १४) | प्राचार्य डॉ. अरुण यादवराव दळवे | पदसिद्ध सचिव |
| १५) | श्री.वामन तुकाराम जाधव | निमंत्रीत सदस्य |
| १६) | श्री. शिवलिंगआप्पा चनबसआप्पा शेटे | निमंत्रीत सदस्य |
| १७ | श्री. शिवाजी बन्सीधर सिरसाट | निमंत्रीत सदस्य |

वसुंधरा कला महाविद्यालय घाटनांदूर ता. अंबाजोगाई जि. बीड

# भारताचे संविधान
## उद्देशिका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे स्वातंत्र्य;
दर्जाची व संधीची समानता;
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;
आमच्या संविधानसभेत
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.

# वसुंधरा गीत

ज्ञानाची अन् अभिमानाची
हिच आमुची परंपरा
तपोभूमिच्या घाटावरती
ज्ञान देते वसुंधरा ।। धृ।।

चालुक्य अन् राष्टकुंटाचे
मूर्ती कलेचे आगार
कर्तृत्वाच्या नेतृत्वाने
नाही घेतली माघार
संघर्षातुनी इथे वाहतो
नव तेजाचा झरा ।।१।।

योगेश्वरी अन् वैद्यनाथांचा
इथे भक्तीचा वास असे
सोमेश्वरांच्या गुरुचरणाचा
घरा-घरातून दास दिसे
बालाघाटाच्या पुण्यभूमीत
वाहतो भक्तीचा वारा ।।२।।

वीरांची अन् त्यागाची
ही भूमी साधू संताची
नटेश्वरांच्या रंग मंदिरी
उधळण कलागुणांची
पैलू पाडिता, घडतो येथे
नवरत्नातील हिरा ।।३।।

वाडी वस्तीची माणसं कष्टाची
समतेची ही बाग फुले
डोंगर दऱ्यातून पाऊल वाटेने
शिक्षण घेण्या येती मुले
ज्ञानाच्या या पंख बळाणे
झेप घेती अंबरा ।।४।।

यशासाठी शिक्षण घेऊनी
ध्वजा फडकली पैलतिरी
गुणवत्तेच्या जगात आम्ही
सुवर्ण पदाचे मानकरी
शोभून दिसतो यशवंत हा
आकाशातील तारा ।।५।।

प्रा.डॉ.संजय खाडप

वसुंधरा कला महाविद्यालय
घाटनांदुर
ता. अंबाजोगाई

Our Motto
Education For Success
**यशासाठी शिक्षण**

### Vision

१. शिक्षणाच्या माध्यमातून ज्ञान प्राप्त करणे.

### Mission

१. सामाजिकदृष्टया उत्पादनक्षम, निरोगी आणि सकारात्मक नागरीक घडविणे.

२. स्पर्धात्मक आकलनक्षम कौशल्यांचा विकास करणे.

३. ज्ञानाची आवड निर्माण करणे.

४. शिक्षणाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण करणे.

५. प्रगत ज्ञानाच्या साह्याने गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे.

### Objectives

१. चांगल्या सवयी आणि शिस्त विद्यार्थ्यांमध्ये रुजविणे.

२. विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानसाधना निर्माण करणे.

३. विद्यार्थ्यांना वैयक्तिक व व्यावसायिक वाढीसाठी सतत प्रोत्साहित करणे.

४. विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी प्रेरणा देणे.

५. विद्यार्थ्यांना जीवनातील प्रत्येक स्पर्धेसाठी तयार करणे.

६. भारतीय संविधानाने दिलेले राष्ट्रीय मूल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजविणे.

वसुंधरा कला महाविद्यालय, घाटनांदुर ता. अंबाजोगाई, जि. बीड

मनोगत......

वसुंधरा महाविद्यालयात प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत करीत असताना, मनस्वी आनंद होत आहे. महाविद्यालयाच्या उभारणी पासून आजपर्यंतची वाटचाल अतिशय आनंददायी आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीन विकास हे अंतिम देह उराशी बाळगून चाललेला प्रवास फलदायी ठरत आहे. म्हणूनच की काय, राष्ट्रीय मूल्यांकन परिषदेने 'बी' दर्जा देवून महाविद्यालयाच्या कार्याचा एकप्रकारे गौरवच केला आहे. हा गौरव विद्यार्थी, कर्मचारी, पालक व परिसरातील गुणीजणांच्या सहकार्याने प्राप्त झाला आहे.

नॅक ला सामोरे जात असताना, माजी विद्यार्थी व पालकांची भूमिका महत्वपूर्ण ठरली. याचे कारण म्हणजे, महाविद्यालयाने राबविलेले विविध उपक्रम होय. हे उपक्रम राबवित असताना, विद्यार्थी व पालकांचा मिळालेला प्रतिसाद उल्लेखनीय आहे. हा उदंड प्रतिसाद दिवसेंदिवस वृध्दींगत व्हावा, म्हणून महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या विकासाचे नव-नवे उपक्रम हाती घेत आहे. प्रामुख्याने यशवंत करीअर ॲकॅडमी सुरु करुन स्पर्धा परीक्षा संदर्भात विद्यार्थ्यांचे मनोधर्य वाढविण्याचे कार्य अविरत चालू आहे. महाविद्यालयात प्रवेशित होतकरु, गरीब विद्यार्थ्यांसाठी, विद्यार्थी विकास निधीद्वारे मदत केली जाते. याशिवाय गरीब, होतकरु व हुशार विद्यार्थ्यांना महाविद्यालयाकडून गणवेशाचे वाटप केले जाते.परिसरातील सार्वजनिक ग्रंथालय सभासद, शिक्षक, पालक, व्यापारी वर्ग इत्यादीसाठी ग्रंथ देवघेव सुविधा, रात्रअभ्यासिका सुविधा, वसुंधरा क्रीडा प्रबोधनी अंतर्गत आत्मनिर्भयता शिबिराचे प्रतिवर्षी आयोजन करुन शालेय गटातील विद्यार्थ्यांचे मनोबल उंचावले जाते.

वसुंधरा कला महाविद्यालय घाटनांदुर

महाविद्यालयाचे विशेष उपक्रम म्हणजे विद्यार्थ्यांना प्रवेश, उदयोग-व्यवसाय मार्गदर्शन व सामुदायिक विवाह सोहळ्याच्या माध्यमातून सहकार्य करुन आयुष्यभर प्रेरणादायी ठरावे, असेच कार्य अविरत सुरु आहे. महाविद्यालयाची गरुड झेप आपल्या सर्वांच्या सहकार्यातून वृध्दींगत होत राहिल हिच अपेक्षा...

**कर्तृत्वाच्या शालीनतेला**<br>
**देवू नका रे गंज चढू**<br>
**आत्मबलाच्या बाहुबलाने**<br>
**सत्यासाठी आपण लढू**

**पुढे जाणाऱ्यास, पुढे जाऊ द्या**<br>
**सळसळणाऱ्या लाटा पाहू द्या**<br>
**त्या लाटावरती स्वार हाऊनी**<br>
**साऱ्या विश्वाचे तेज पाहू द्या**

**डॉ. अरुण दळवे**<br>
**प्राचार्य**<br>
वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर

> भुकेसाठी मागू नये, भीक पोलादी हातांनी<br>
> तुटू लागता आतडी, सूर्य खुडावा दातांनी

वसुंधरा कला महाविद्यालय, घाटनांदुर ता. अंबाजोगाई, जि. बीड

## * महाविद्यालयीन सुविधा *

महाविद्यालयाचा विद्यार्थी, माजी विद्यार्थी, परिसरातील शालेय विद्यार्थी व समाजातील निरनिराळ्या घटकांना महाविद्यालयाने विविधा सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. त्या खालील प्रमाणे.

* **ग्रंथालयीन सुविधा :-** महाविद्यालयाचा ग्रंथालय विभाग अभ्यासक्रम, वैचारिक ग्रंथ व संदर्भ ग्रंथानी सुसज्ज आहे. ग्रंथालयात मराठी, हिंदी, इंग्रजी, आदी भाषासह इतर सामाजिकशास्त्रातील ग्रंथसंपदा जवळपास ७२०४ एवढी आहे. ग्रंथालयात क्रमीत पुस्तकांसोबत इतर विषयाचे संदर्भ ग्रंथ, वर्तमान पत्रे, नियतकालिके व अन्य अभ्यासपूरक साहित्य उपलब्ध आहे. ग्रंथालयाला जोडून स्वतंत्र वाचनकक्ष व अभ्यासिकेची सोय केली आहे. ग्रंथालयातून पुरवली जाणारी सुविधा खालील प्रमाणे.

१) गरिब व होतकरु (Poor & Hard Working) विद्यार्थ्यांसाठी जास्तीचे पुस्तके देणयाची सुविधा.

२) माजी विद्यार्थ्यांना ग्रंथालय सुविधा.

३) विद्यार्थ्यांसाठी बुक बँक योजने अंतर्गत वर्षभरासाठी ग्रंथ देवघेव सुविधा.

४) परिसरातील सार्वजनिक वाचनालयातील सभासदांना ग्रंथ देवघेव सुविधा.

५) वाचन संस्कृती वृध्दिंगत करण्यासाठी घाटनांदूर व परिसरातील पालक, व्यापारी वर्ग, शिक्षक, संशोधक यांच्यासाठी ग्रंथ देवघेव सुविधा.

६) विद्यार्थी/विद्यार्थीनीसाठी स्वतंत्र संगणक उपलब्ध.

७) E-Books, E-Journals, स्पर्धा परीक्षात्मक माहिती विद्यार्थी/विद्यार्थीनी, शिक्षकांसाठी उपलब्ध.

८) मागेल ते पुस्तक उपलब्ध करुन देण्याची सोय.

९) मोफत इंटरनेट सुविधा.

१०) **रात्रीची अभ्यासिका :-** महाविद्यालयात रात्रीच्या अभ्यासिका सुरु करणयात आलेल्या आहेत.यासाठी महाविद्यालयाचे ग्रंथालय उघडे ठेवण्यात येते. विविध विषयाचे प्राध्यापक अभ्यासिकेला भेटी देऊनमार्गदर्शन करतात. वेळ -७.०० ते १०.००

* **सुसज्ञ प्रयोगशाळा :-** भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, संगणकशास्त्र, भूगोल या विषयाच्या प्रयोगशाळा अत्याधुनिक उपकरणांसाठी सुसज्ज आहेत.

* **यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र : वसुंधरा महाविद्यालयामध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांनी अभ्यासकेंद्रास जुलै २०१८ पासून मान्यता दिली आहे. या केंद्रावर पूर्वतयारी, बी.ए.पदवी अभ्यासक्रमाचे वर्ग चालविण्यात येते आहे. समाजातील आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या नागरिकांना, नोकर वर्गाला आपले शिक्षण पूर्ण करण्याची संधी व स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणे, हा या केंद्राचा उद्देश आहे. अभ्यासक्रमाचा आणि पदवीचा दर्जा हा इतर विद्यापीठाच्या दर्जासमान आहे. या सुवर्ण संधीचा सर्वांनी लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी अभ्यासकेंद्राचे केंद्र संयोजक प्रा. गजानन सवने (मो. ९४२१९९२३३५) यांना प्रत्यक्ष भेट द्यावी.**

वसुंधरा कला महाविद्यालय घाटनांदुर

* **राष्ट्रीय सेवा योजना :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने महाविद्यालयास राष्ट्रीय सेवा योजनेचे एक युनिट दिले आहे. ज्या विद्यार्थ्यांना सामाजिक कार्याची आवड व तळमळ आहे, अशा विद्यार्थ्यांना या योजने अंतर्गत सहभागी होता येते. पुढीलप्रमाणे विभागाच्या वतीने वर्षभर विविध कार्यक्रम राबविले जातात.

१) **महापुषांची जयंती व पुण्यतिथी :-** महाविद्यालयात रा.से.यो. विभागाच्या वतीने महापुरुषांची जयंती व पुण्यतिथी कार्यक्रम घेण्यात येतो. यामुळे विद्यार्थ्यामध्ये नेतृत्व विकास, सामाजिक, राष्टीय एकात्मतेची जाणीव निर्माण होते.

२) **राष्ट्रीय उपक्रमात सहभाग :-** पल्स पोलियो, एड्स जनजागृती, मतदार जनजागृती, रस्ता सुरक्षा अभियान,भूकंपग्रस्तांना मदत, जलसाक्षरता इ. राष्ट्रीय कार्यक्रमात सहभाग नोंदवला जातो.

३) **सामाजिक उपक्रम :-** रक्तदान शिबिर, अंधश्रध्दा निर्मूलन, स्त्री–पुरुष समानता, समाज प्रबोधन पर कार्यक्रम घेतले जातात. तसेच विभागाच्या वतीने नाम फाऊंडेशन, लोकजागर सेवाभावी संस्था, पाटोदा यांना आर्थिक मदत केली आहे. तसेच युथ मिनिस्ट्री ग्रुप, अंबाजोगाई यांच्या विविधा उपक्रमात रा.से.यो. विभागाचा सक्रिय सहभाग असतो.

४) **रोपवाटीका :-** महाविद्यालय उद्यानातील रोपवाटीकेतून महाविद्यालयीन विद्यार्थी, परिसरातील शालेय विद्यार्थ्यांमार्फत परिसरातील विविध कार्यालयात रोपं पुरविले जातात. तसेच रस्त्याच्या दूतर्फा वृक्षारोपण केले जाते.

५) **दत्तकगाव योजना :-** महाविद्यालयातील रा.से.यो. विभागाने चोथेवाडी हे गाव पुढील पाच वर्षासाठ दत्तक घेतले आहे. मागील पाच वर्षापासून रा.से.यो. चे शिबिर चोथेवाडी येथे घेतले जाते. या शिबिरात गावातील स्वच्छता, वृक्षारोपन जलजागृती, अंधश्रध्दा निर्मूलन इ. कार्यक्रम राबविले जातात. याचा परिणाम म्हणून महाराष्ट शासनाने चोथेवाडी या गावाची हागणदारी मुक्त गाव म्हणून १९ फेब्रुवारी २०१६ ला घोषणा केली.

६) **कै. वसंतराव काळे कमवा आणि शिका योजना :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर यांच्या संयुक्त विद्यमाने गरीब व होतकरु विद्यार्थ्यांसाठी कै. वसंतराव काळे कमवा व शिका योजना महाविद्यालयात कार्यान्वित आहे. याचा लाभ गरजू विद्यार्थ्यांनी घ्यावा.

* **वसुंधरा क्रीडा प्रबोधिनी :-**

१) **विविध खेळांचे आयोजन :-** आमच्या महाविद्यालयामध्ये आतापर्यंत शालेय तालुका स्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये १४,१७ व १९ वर्षातील मुले/मुली कब्बडी स्पर्धेचे एक वेळेस व कुस्ती स्पर्धेचे दोन वेळेस तसेच संघटनेच्या राज्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये सायकल पोलो व तलवारबाजी आंतर महाविद्यालयीन तलवारबाजी दोन वेळेस व ज्युडो स्पर्धा महाविद्यालयात घेण्यात आली.

२) **विविध स्तरातील स्पर्धेत सहभाग :-** आतापर्यंत महाविद्यालय व परिसरातील तलवारबाजी, सायकल पोलो, इनडोअर क्रिकेट, सर्कल कब्बडी, खो–खो अशा विविध खेळामध्ये खेळाडूंना पदक प्राप्त झाले आहे. यामध्ये इश्वर कन्हेरे, अक्षय गायकवाड, विश्वजीत गित्ते, प्रशांत बिरादार, गिता गोदाम, पिराजी कुसळे, प्रसाद मोरे, प्रियंका मिसाळ, पवन निळे इत्यादी खेळाडू पदक विजेते आहेत.

वसुंधरा कला महाविद्यालय, घाटनांदुर

**३) आत्मनिर्भयता प्रशिक्षण शिबिर :–** परिसरातील विविध शाळेतील बाल व कुमार गटातील मुलेंव मुलींना खेळाची आवड व्हावी, म्हणून उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले जाते. त्यामध्ये अनेक नविन खेळाचे प्रशिक्षण दिले जाते. तलवारबाजी, रग्बी फुटबॉल, व्हॉलीबॉल, मैदानी खेळ (अॅथलॅटीक्स)इत्यादी. तसेच योगा, आर्ट ऑफ लिविंग संगीत, व्यक्तीमत्व विकास, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, ग्रंथालयाची ओळख, चित्रकला, साहित्य लेखन, संगणक ज्ञान इत्यादी कार्यक्रम घेण्यात येतात.

**४) विविध खेळांचे मार्गदर्शन :–** महाविद्यालयामध्ये शालेय, अंतर महाविद्यालयीन, राज्य–राष्ट्रीय स्तरावर जाण्यासाठी विविध खेळाचे मार्गदर्शन करण्यात येते. महाविद्यालयातील मुले/मुली व परिसरातील खेळाडू या स्पर्धेमध्ये सहभागी होतात. सायकल पोलो, तलवार बाजी, इनडोअर क्रिकेट, सर्कल कब्बडी, खो–खो, मैदानी स्पर्धेत विद्यार्थी सहभाग नोंदवतात.

*** अध्ययन व अध्यापन :–** महाविद्यालयात अध्ययन व अध्यापनाची प्रक्रिया दर्जेदार तर असावीच, पण जागतिक स्पर्धेच्या युगात संदर्भमूल्य रहावी. म्हणून पारंपरिक व्याख्यान पध्दती बरोबरच इतर अत्याधुनिक साधनांचा वापर करुन ती प्रभावशाली कशी राहील. याकडे महाविद्यालय विशेष लक्ष देते. विद्यार्थ्यांना विषयाचा स्वतंत्रपणे वेध घेता यावा. त्याचे यथार्थ मूल्यांकन करता यावे, यासाठी हे महाविद्यालय प्रयत्नशिल राहते. त्यासाठी खालील पध्दतीचा उपयोग करण्यात येतो.

१. व्याख्यान पध्दती, २. चार्चासत्रे, ३. गट चर्चा, ४. सर्वेक्षण, ५. निबंधस्पर्धा, ६. सत्रपरीक्षा
७. वर्गचाचणी व गृहपाठ, ८. तज्ञ व्यक्तींची व्याख्याने, ९. पृत्याभरण.

*** पालक मेळावा :** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे पालकत्व हे शिक्षक/प्राध्यापकांचे आहे. हीच भूमिका महाविद्यालय प्रामाणिकपणे पार पाडत आहे. परंतु विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा अहवाल पालकांना देणेही तितकेच महत्वाचे असते. या हेतुने पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात येते. या पालक मेळाव्याच्या माध्यमातून खालील उपक्रम राबवले जातात.

१. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करणे.
२. विद्यार्थी–पालकांच्या अडचणी समजून घेणे.
३. विद्यार्थी महाविद्यालयात नियमित उपस्थित रहावा.
४. विद्यार्थ्यांनी घरी अभ्यास करावा.
५. विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाशिवाय इतर उपक्रमात सहभाग नोंदवावा.
६. पालकांनी महाविद्यालयात वेळोवेळी संपर्क साधावा.

*** माजी विद्यार्थी संघटना :–** महाविद्यालयातील माजी विद्यार्थी, आज शैक्षणिक, सामाजिक,राजकीय, औद्योगीक अशा वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत आहेत. या सर्व माजी विद्यार्थ्यांना एकत्र करुन त्यांची माजी विद्यार्थी संघटना स्थापन केली आहे. या संघटनेच्या माध्यमातून सकारात्मक कार्य पार पडत आहेत.

*** व्यवसाय मार्गदर्शन व स्पर्धा परीक्षा केंद्र :** विद्यार्थ्यांना महाविद्यालयात नियमित अभ्यासक्रमाव्यतिरिक्त यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी शैक्षणिक वर्ष २००९–१० या वर्षापासून स्पर्धा केंद्राची सुरुवात झाली. या केंद्रामार्फत पदवी शिक्षणाबरोबर विविध क्षेत्रातील व्यवसाय व नोकरीची संधी मिळावी. यासाठी तज्ञ प्राध्यापकांच्या मार्गदर्शन वर्गाचे आयोजन केले जाते. व्यवसाय मार्गदर्शन व स्पर्धा परीक्षा केंद्रामार्फत खालील उपक्रम चालविले जातात.

वसुंधरा कला महाविद्यालय घाटनांदुर ता. अंबाजोगाई, जि. बीड

**२) भित्तीपत्रक :-** महाविद्यालयातील विविध विभागाच्या वतीने वर्षभरातून दोन भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात येते. या भित्तीपत्रकातून नवोदीत लेखकांचे साहित्य प्रकाशित केले जाते.

**३) वाद-विवाद व वक्तृत्व स्पर्धा :-** महाविद्यालयात कै. वामनराव देशमुख मराठवाडा स्तरीय वाद विवाद स्पर्धेचे आयोजन केले जाते. याशिवाय वक्तृत्व व वाद विवाद स्पर्धेत सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले जाते.

**४) खुले लोककला महोत्सव :-** घाटनांदूर व परिसरातील कलावंताच्या सुप्त गुणांना वाव मिळावा, म्हणून महाविद्यालयात दरवर्षी जानेवारी महिन्यात खुल्या लोककला महोत्सवाचे आयोजन केले जाते. या महोत्सवातून महाराष्ट्रीयन लोककलेचे सादरीकरण केले जाते

**५) प्रकाशन सोहळा :-** महाविद्यालय व परिसरातील नवोदित साहित्यिकांच्या पुस्तकांचे प्रकाशन स्नेह संम्मेलन प्रसंगी केले जाते.

**६) विवाह सोहळा :-** महाविद्यालय, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी सतत प्रयत्नशील असते. शिक्षण, संस्कार व्यवसायाबरोबरच होतकरु विद्यार्थ्यांचा विवाह लावून सामाजिक दायित्व जोपासण्यासाठी महाविद्यालय प्रयत्नशील असते.

**७) शब्दाई वार्षिकांक :-** महाविद्यालयाचा चेहरा असलेला व परिसरातील नव साहित्यिकांना प्रेरणा देणारा 'शब्दाई' वार्षिकांक जानेवारी महिण्यात स्नेह संमेलनातून प्रकाशित केला जातो. हा अंक मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतून असेल. या विशेषाकांच्या माध्यमातून उद्याचे लेखक, कवी, विचारवंत व भाष्यकार निर्माण व्हावेत, त्यांच्या प्रतिभेला अंकुर फुटावेत, यासाठी प्रयत्न केला जातो.

* **विद्यार्थी संसद :-** महाविद्यालयात वर्षभर अभ्यासक्रमा शिवाय व अभ्यासक्रमपुरक उपक्रम राबविले जातात. विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.त्याच हेतुने विद्यार्थ्यांना सांस्कृतिक, बौध्दिक,शारीरिक,आणि सृजनशिलतेला संधी देऊन त्याचे यथायोग्य संवर्धन करण्यासाठी हे उपक्रम राबविले जातात.यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग क्रियाशील व विधायक रहावा, यासाठी विद्यार्थी संसदेची स्थापना केली जाते.

* **वसुंधरा पॅटर्न :-** विद्यार्थ्यांसाठी दररोजच्या नियमित तासिका व्यतिरिक्त जादा/जास्तीच्या, वेगळ्या तासिका, सराव परीक्षा घेवून विशेष तयारी करुन घेतल्या जातात. मागील दोन वर्षापासून वसुंधरा पॅटर्नला सुरुवात करण्यात आली. यामुळे महाविद्यालयाचे अनेक विद्यार्थी विशेष प्राविण्याने उत्तीर्ण झाले आहेत.

महाविद्यालयात प्रवेश घेणारे बहुतांश विद्यार्थी मागास व ग्रामीण भागातील आहेत. त्यामुळे या पॅटर्न अंतर्गत ज्यादा तासांचे आयोजन करुन त्यांना विशेष कोचिंग केली जाते. विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी विशेष तयारी वर्ग चालविले जातात. यामुळे बी.एड्/एम.एड्प्रवेशासाठी

शेकडो विद्यार्थी देणारे हे महाविद्यालय म्हणूनही परिसरात व जिल्ह्यात या महाविद्यालयाची ओळख आहे. काही विद्यार्थी दररोज गावी ये-जा करुन महाविद्यालयात उपस्थित राहतात, अशा विद्यार्थ्यांना एस.टी. बस पासची सवलत दिली जाते. यासाठी महाविद्यालय विद्यार्थ्यांना सहकार्य करते.

*** महिला कक्ष :-**

**१) अंतर्गत तक्रार निवारण समिती (विशाखा समिती) :-** ही समिती महाविद्यालयात शै.वर्ष २००९ मध्ये महिलावर लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी व रँगिंग होऊ नये, म्हणून स्थापण केली आहे. यामध्ये सर्व विद्यार्थीनींच्या समस्या सोडविल्या जातात. तसेच या समितीच्या माध्यमातून महिलावरील अत्याचार रोखण्यासाठी विविध कार्यक्रमातून जागृती केली जाते.

**२) महिला तक्रार :-** विद्यार्थीनीचे मनोधैर्य वाढवण्यासाठी महाविद्यालयात तक्रार पेटी लावण्यात आली आहे. यामध्ये महाविद्यालयात हिंसक कृत्य करणे, मुलीची छेडछाड करणे, टोमणे मारणे, अश्लिल चाळे करणे, भीतीदायक वातावरण निर्माण करणे, शारीरिक व मानसिक त्रास देणे, इत्यादी बाबी मुली कोणासमोर ही सांगू शकत नाही. पण गुप्तपणे मांडू शकतात, म्हणून महाविद्यालय व पोलीस स्टेशन, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने महिला तक्रार पेटी लावण्यात आली आहे.

**३) पोलीस जाहीर आवाहन :-** सदर समिती पोलीस स्टेशनच्या सहकार्याने महिला व मुलींना आत्मनिर्भय बनवून संरक्षण देते. मुलींना त्रास झाल्यास पुढील क्रमांकावर संपर्क साधावा - पोलिस हेल्पलाईन क्र.१०९१, ०२४४६-२४८५४२, ९४२०६५२९७०

*** यशवंत पुरस्कार :-** महाविद्यालयात प्रतिवर्षी २८ जानेवारी रोजी स्नेह संमेलनात गुणवंताचा गौरव करण्यासाठी यशवंत पुरस्काराचे वितरण करण्यात येते. या पुरस्काराचे स्वरुप खालील प्रमाणे आहे.

**१) उल्लेखनीय कार्यासाठी यशवंत पुरसकार :-** महाविद्यालय परिसरातील सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या एका व्यक्तीस प्रतिवर्षी स्नेह संमेलनात यशवंत पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते.

**२) उत्कृष्ट निकाल प्राप्त शाळेला यशवंत पुरस्कार :-** घाटनांदूर परिसरातील माध्यमीक व उच्च माध्यमिक सर्वोत्कृष्ट निकाल प्राप्त प्रथम व व्दितीय शाळेला यशवंत पुरस्काराने सन्मानित करण्यात येते.

**३) यशवंत पुरस्कार :-** महाविद्यालय, परिसरातील इयत्ता १० वी व १२ वी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातून ज्या विद्यार्थ्यांने प्रथम क्रमांकाने यश संपादन करुन विद्यालयाचे नाव उज्वल केले आहे. अशा गुणवंत विद्यार्थ्यांना दरवर्षी स्नेह संमेलनात यशवंत पुरस्काराने सन्मानित केले जाते.

वसुंधरा कला महाविद्यालय, घाटनांदुर ता. अंबाजोगाई जि. बीड

**वरिष्ठ महाविद्यालयातील अभ्यासक्रम :**

* प्रथम वर्षासाठी संगणकशास्त्र तर द्वितीय वर्षासाठी पर्यावरणशास्त्र अनिवार्य आहे.

| | |
|---|---|
| * कला शाखा : | प्रथम वर्ष |
| अनिवार्य विषय : | इंग्रजी |
| द्वितीय भाषा : | मराठी/हिंदी |
| ऐच्छिक विषय : | १. मराठी/हिंदी/इंग्रजी |
| | २. इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, राज्यशास्त्र अर्थशास्त्र, लोगप्रशासन, संरक्षणशास्त्र |

**खालील ग्रुप पैकी कोणत्याही एका ग्रुपची निवड करावी.**

१) मराठी राज्यशास्त्र संरक्षणशास्त्र
२) मराठी लोकप्रशासन भूगोल
३) मराठी इतिहास भूगोल
४) मराठी भूगोल अर्थशास्त्र
५) मराठी राज्यशास्त्र अर्थशास्त्र
६) मराठी भूगोल समाजशास्त्र
७) हिंदी अर्थशास्त्र भूगोल
८) हिंदी भूगोल लोकप्रशासन
९) हिंदी समाजशास्त्र भूगोल
१०) हिंदी राज्यशास्त्र संरक्षणशास्त्र
११) हिंदी राज्यशास्त्र इतिहास
१२) इंग्रजी लोकप्रशासन भूगोल
१३) इंग्रजी अर्थशास्त्र समाजशास्त्र
१४) इंग्रजी लोकप्रशासन संरक्षणशास्त्र
१५) इंग्रजी राज्यशास्त्र लोकप्रशासन
१६) इतिहास भूगोल राज्यशास्त्र
१७) राज्यशास्त्र लोकप्रशासन
१८) भूगोल समाजशास्त्र अर्थशास्त्र

प्रथम वर्षासाठी निवडलेले विषय हेच व्दितीय वर्षासाठी राहतील.

**कला तृतीय वर्ष :-**

एक ऐच्छिक विषय मुख्य विषय म्हणून निवडावा लागेल–त्याचे चार पेपर प्रत्येकी १०० गुणांचे राहतील. उर्वरीत दोन ऐच्छिक विषयांचे दोन पेपर प्रत्येकी १०० गुणांचे राहतील.

**ऐच्छिक विषय :-** १. इंग्रजी/मराठी/हिंदी
२. लोकप्रशासन/ अर्थशास्त्र
३. राज्यशास्त्र/ समाजशास्त्र
४. भूगोल /संरक्षणशास्त्र
५. इतिहास

**The Great Man Always Willing to be a little**

वसुंधरा कला महाविद्यालय, घाटनांदुर ता. अंबाजोगाई, जि. बीड



वसुंधरा कला महाविद्यालय, घाटनांदुर ता. अंबाजोगाई, जि. बीड

### विज्ञान शाखा (प्रथम,व्दितीय व तृतीय वर्ष) :-

Compulsory Subject :- English
Second Language :- Marathi/ Hindi
B.Sc. General (Tick any one of the following combination)

1. Chemistry-Botany-Zoology
2. Computer-Botany-Zoology
3. Computer-Chemistry-Math
4. Physics-Computer-Math
5. Physics-Chemistry-Computer Science.
6. Physics-Chemistry-Math

### वाणिज्य शाखा

**बी.कॉम. प्रथम वर्ष** (Credit Based)

1. English (Compulsory)
2. Marathi/Hindi (Second Language)
3. Business Communication & IT App-I
4. Entrepreneurship Devlopment
5. Busi. and Industrial Economics
6. Busi. Math and Statistics
7. Financial Accounting

**बी.कॉम. व्दितीय वर्ष**

1. English (Compulsory)
2. Marathi/Hindi (Second Language)
3. IT. App. in Business
4. Principles of Business
5. Corporate Accounting
6. Busi. Regulatory Framework

Optional Subject

1. Marketing Management/ Human Resource Management/ Financial Management

**बी.कॉम. तृतीय वर्ष**

1. Advanced Financial Accounting
2. Management Accounting
3. Cost Accounting
4. Indirect Taxes & Direct Taxes
5. New Auditing Trends

Optional Subjects

1. Information & Communication Technology/Banking & Insurance/ Small Bus. Parad. & Supply Chain Management/ Co-oprative Management & Retail Management/Rural Development & agricultural Marketing

वसुंधरा कला महाविद्यालय, घाटनांदूर ता. अंबाजोगाई जि. बीड

आरक्षण :– शासकीय निर्णयानुसार आरक्षण लागू राहील.

| अ.क्र. | प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती | १३ % |
| २. | अनुसूचित जमाती | ०७ % |
| ३. | विमुक्त जाती (अ) | ०३ % |
| ४. | भटक्या जमाती (ब) | २.५ % |
| ५. | भटक्या जमाती (क) | ३.५ % |
| ६. | भटक्या जमाती (ड) | २ % |
| ७. | इतर मागासवर्ग | १९ % |
| ८. | विशेष मागासवर्ग | २ % |
| ९. | सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्ग | १६% |
| १०. | आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक | १०% |
| ११. | खुला | २२% |

**विद्यार्थ्यांसाठी महत्वपूर्ण सूचना :–**

* प्रवेशासंबंधी :–

१. सर्व प्रेवश संगणकीकृत केले जातील. विद्यार्थ्यांनी आपला कायम नोंदणी क्रमांक वापरावा.

२. विद्यापीठाने ई–सुविधेव्दारे केवळ प्रथम वर्षाचे प्रवेश निश्चित करण्याचे ठरवलेले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी पुढील बाबींची पुर्तता करावी

१. ई–सुविधा फॉर्म भरणे २. दोन फोटो ३. संपूर्ण पत्ता ४. रक्तगट

५. १० वी १२ वी च्या गुणपत्रिका व प्रमाणपत्र (सनद) ६. जात प्रमाणपत्र

७. अपंग असल्यास प्रमाणपत्र

३. विद्यार्थ्यांनी आपल्या मूळ कागदपत्राच्या पुरेशा सत्यप्रती स्वत:कडे ठेवाव्यात.

४. विद्यार्थ्यांनी निर्धारीत वेळेत आवश्यक कागदपत्रे (स्कॉलरशीप./इबीसी/पात्रता प्रमाणपत्र/स्थलांतर प्रमाणपत्र) सबंधिताकडे सादर करावीत.

५. सर्व प्रवेश तात्पुरते असतील. प्राचार्यांच्या अधिकारात पडताळणी झाल्यानंतर प्रवेश कायम होतील.

६. प्रवेशासाठी आधारकार्ड अनिवार्य आहे.

७. विद्यार्थ्यांनी प्रवेशासंबंधी सर्व पावत्या जपून ठेवाव्यात. प्रवेश रद्द करताना

वसुंधरा कला महाविद्यालय, घाटनांदूर ता. अंबाजोगाई, जि. बीड

त्याशिवाय कोणतीही देय फीस परत मिळणार नाही.

८. प्रथम सत्रात प्रवेश रद्द केल्यास शैक्षणिक शुल्क ५० % भरावे लागेल.

९. जर द्वितीय सत्रात प्रवेश रद्द केल्यास शैक्षणिक शुल्क पूर्ण भरावे लागेल.

* **उपस्थितीसंबंधी :-**

१. ७५% उपस्थिती अनिवार्य आहे. त्याशिवाय परीक्षा फॉर्म स्विकारला जाणार नाही.

२. सतत गैरहजर राहिल्यास प्रवेश रद्द करण्यात येईल.

३. वर्ग चाचण्या व गृहपाठ, सत्रपरीक्षा बंधनकारक राहतील.

४. वर्षभरातील प्रगती पाहून वेळोवेळी पालकांशी सुसंवाद साधला जाईल.

५. महाविद्यालय व महाविद्यालयाच्या परिसरात गैरवर्तनाला सक्त मनाई आहे.

* **ग्रंथालयासंबंधी :-**

१. पुस्तकांच्या देवाण -घेवाणीसाठी ग्रंथालय कार्ड व ओळखपत्र आवश्यक आहे.

२. ग्रंथालय कार्डावर एकावेळी २ पुस्तके आठवड्यासाठी मिळतील.

३. ओळखपत्र प्रवेश पूर्ण झाल्यावर द्यावे लागेल.

४. दुसरे ओळखपत्र हवे असल्यास ४० रू फिस भरावी लागेल.

५. निर्धारीत वेळेच्या आत पुस्तके परत न केल्यास एका पुस्तकासाठी दर दिवस १ रू प्रमाणे दंड आकारला जाईल.

६. पुस्तके घेताना तपासून घ्यावेत.

७. पुस्तके फाटल्यास वा गहाळ केल्यास पुस्तकांची किंमत दीडपट भरावी लागेल.

८. वार्षिक परीक्षेपूर्वी पुस्तके परत करावीत अथवा पुस्तकाच्या किंमती एवढी अनामत रक्कम जमा करून पुस्तके घेता येतील.

९. संदर्भ ग्रंथ, मासिके, वृत्तपत्रे, वाचन कक्षात उपलब्ध होतील ते घरी घेवून जाता येणार नाहीत.

* **शिस्त व आचरणासंबंधी :-**

१. स्वयंशिस्त : उत्तम शिस्त.

२. विद्यार्थ्यांनी सर्वांशी सौजन्याने वागावे.

३. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील व बाहेरील वर्तन महाविद्यालयाच्या प्रतिष्ठेला बाधा आणणारे नसावे.

वसुंधरा कला महाविद्यालय, घाटनांदुर ता. अंबाजोगाई, जि. बीड

४. विद्यार्थ्यांनी ओळखपत्र नेहमी सोबत ठेवावे.

५. महाविद्यालयाबाहेरील विद्यार्थ्यांना सोबत आणू नये.

६. सर्व विद्यार्थ्यांनी सर्व तासिकांना उपस्थित राहावे. तासिका नसताना ग्रंथालय भ्यासिकेचा उपयोग करावा.

७. सर्व विद्यार्थ्यांनी बाह्य घटकांचा महाविद्यालयावर प्रभाव आणि परिणाम होणार नाही याची दळल घ्यावी.

८. महाविद्यालयाच्या परिसरात धुम्रपानास सक्त मनाई आहे.

९. महाविद्यालयाच्या परिसरात मोबाईल वापरास सक्त मनाई आहे.

१०. जाणिवपूर्वक महाविद्यालयातील व्याख्याने व इतर उपक्रमात अडथळा केल्यास नियमानुसार कार्यवाही केली जाईल.

११. तासिका सुरू असताना महाविद्यालय परिसरात फिरू नये.

१२. परिसर, इमारत व फर्निचर यांची नासधूस करु नये.

१३. आपली वाहने पार्किंगमध्ये लावावीत.

१४. वरील सर्व शिस्त व आचासंहितेचे पालन करावे, न केल्यास नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

* **महाविद्यालयात रँगिंग होऊ नये, म्हणून करण्यात येणाऱ्या उपाय योजना व सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन.**

* **रँगिग होऊ नये या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय, राघवन समितीचा अहवाल व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात येते.**

१. रँगिंग सारख्या गुन्ह्यांची पुनरावृत्ती होऊ नये.

२. संस्थेस /महाविद्यालयास रँगिंगच्या स्थानिक पोलिसांकडे एफ.आय.आर. दाखल करण्याचा अधिकार आहे.

३. महाविद्यालयात रँगिंग मध्ये गुंतलेल्या विद्यार्थ्यांस प्रवेश देण्यात येणार नाही.

४. महाविद्यालयात रँगिंग प्रतिबंध करण्यासाठी परिणामकारक उपाय योजना केलेली आहे.

५. महाविद्यालयात रँगिंग प्रतिबंध समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

